


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २०३ * नांदेड * शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# नांदेड जिल्ह्यातील ७३ महसूल मंडळांत अतिवृष्टी; किनवट-माहूर तालुक्यात पावसाचा कहर

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात गेल्या २४ तासांत पावसाने जोरदार हजेरी लावत ९३ महसूल मंडळांपैकी तब्बल ७३ महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. विशेषतः किनवट, माहूर, मुदखेड, हदगाव, अर्धापूर, उमरी, कंधार, लोहा आणि नांदेड तालुक्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक ठिकाणी नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. पैनगंगा आणि आसना नदीला पूर आला आहे.




जिल्ह्यातील सर्वाधिक पावसाची नोंद किनवट तालुक्यातील उमरी बाजार महसूल मंडळात २५१. ५० मिमी झाली असून त्यानंतर मांडवा २३९.७५ मिमी, माहूर २२३ मिमी, टाकळी १९४. ५० मिमी, वाई १९४.५० मिमी, सिंदखेड १९४.५० मिमी, सिंदगी १४१ मिमी, वानोळा १४१ मिमी, खानापूर (देगलूर) १३८ मिमी आणि चांदोळा (मुखेड) १३९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या भागात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे.

मुदखेड तालुक्यात मुदखेड येथे ११५ मिमी, मुगट येथे ११०. ५० मिमी, तर अर्धापूर येथे १०३ मिमी, उमरी येथे १०४ मिमी, हदगाव तालुक्यात निवधा येथे ११३ मिमी आणि तळणी येथे १०९.५० मिमी पावसाची नोंद झाली. कंधार, लोहा, नांदेड, बिलोली, भोकर, हिमायतनगर, धर्माबाद आणि नायगाव तालुक्यांतील बहुतांश महसूल मंडळांतही ६५ मिमीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने अतिवृष्टीची नोंद करण्यात आली आहे. नांदेड शहर व परिसरातही जोरदार पावसाची नोंद झाली. नांदेड शहर, तुप्पा, वसरणी, विष्णुपुरी, लिंबगाव, तरोडा आणि नाळेश्वर महसूल मंडळांत ६८ ते ९९ मिमी दरम्यान पाऊस झाला. त्यामुळे सखल भागात पाणी साचणे, रस्त्यांवर पाणी वाहणे आणि वाहतुकीवर परिणाम झाल्याचे चित्र दिसून आले.

दरम्यान दुसऱ्या दिवशी शुक्रवारी दुपारी १ वाजेपर्यंत पावसाने उघडीप दिली. यानंतर पुन्हा पाऊस सुरू झाला. लपंडाव करत सायंकाळपर्यंत पावसाने चांगलीच हजेरी लावली होती.

# सायबर फसवणुकीसाठी बँक खात्यांचा गैरवापर; सव्वा कोटींच्या व्यवहाराचे ३ गुन्हे दाखल

## नांदेडमध्ये 'म्युल अकाउंट' रॅकेटचा पर्दाफाश; ६ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात सायबर पोलीस ठाणे व वजिराबाद पोलीस ठाणे येथे आर्थिक फसवणूक व बँक खात्यांचा गैरवापर केल्याप्रकरणी ३ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या तिन्ही प्रकरणांत मिळून १ कोटी १४ लाख ६६ हजार ६६४ रुपयांहून अधिक रकमेचा संशयास्पद व्यवहार झाल्याचे उघड झाले आहे.

६ आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या गंभीर प्रकारावरून आता सायबर फसवणुकीसाठी इतरांच्या बँक खात्यांचा वापर आर्थिक गैरव्यवहारासाठी करण्यात येत असल्याचे पुरावे मिळत आहेत.

शहरातील साईनगर, सिडको येथील आरोपी निलेश प्रभाकर वासमवार (रा. व्हीडी कॉलनी, साईनगर, सिडको) याने आपल्या बँक ऑफ बडोदा, सिडको शाखेतील खात्याचा वापर करून फसवणुकीतून प्राप्त झालेली ९ लाख रक्कम स्वीकारल्याचा आरोप आहे. त्यापैकी २० हजार एटीएमद्वारे, तर ८ लाख ८० हजार धनादेशाद्वारे काढण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. NCRP व SAMANVAY पोर्टलवरील माहितीच्या आधारे सायबर पोलिसांनी हा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

शहरातील काबरा नगर येथील आरोपी कैलास दत्ताराव लिंगायत यांच्या नॅशनल मर्चंट बँक खात्यात २१ लाख फसवणुकीची रक्कम जमा झाल्याचे समोर आले आहे. संबंधित खात्याचा वापर आर्थिक फसवणुकीसाठी केल्याचा आरोप असून NCRP व SAMANVAY पोर्टलवरील पडताळणीनंतर सायबर पोलिसांनी बीएनएस व माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

आरोपी राजेंद्र दुवे, आयुष, सनी सिंह (रा. कोलकाता), विजय खटके (रा. गोपाळ चावडी) यांनी संगनमत करून मोहित सुशील खीयानी (रा. श्रीपाद नगर, कौठा) यांच्या येस बँक (पान ३ वर...)







## लोकसभेचे कामकाज ३ ऑगस्टपर्यंत स्थगित

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** राम मंदिरातील प्रसादाच्या चोरीच्या निषेधार्थ शुक्रवारी संसद परिसरात विरोधी पक्षाच्या खासदारांनी आंदोलन केले. खासदार पप्पू यादव पुजाऱ्याच्या वेशात आले आणि त्यांनी दानपेटी आणली होती. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षाच्या खासदारांनी दानपेटीत देणगी जमा केली. यानंतर प्रतिकात्मक पद्धतीने पप्पू यादव यांनी दानपेटी घेत पळून जाण्याचा प्रयत्न केला. यानंतर त्यांना खासदारांनी पकडले. त्यांनी 'अमित शाह संसदेतून का गायब?' असे लिहिलेले फलकही हातात घेतले होते. दरम्यान, लोकसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू झाले, परंतु विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे ते दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दुपारी १२ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर, लोकसभेने जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) विधेयक, २०२६ आवाजी मतदानाने मंजूर केले. लोकसभा आणि राज्यसभा यांचे कामकाज ३ ऑगस्टपर्यंत तहकूब करण्यात आले आहे.




## इथेनॉल वापराने मायलेज घटण्याचा संभव -गडकरी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** ई- २० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल वापरल्यास वाहनाच्या प्रकार आणि वयानुसार इंधन कार्यक्षमता (मायलेज) २ ते ६ टक्क्यांनी कमी होऊ शकते, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी लोकसभेत दिली. मात्र, ई-२० इंधनामुळे इंजिनमध्ये कोणतेही बिघाड होत असल्याचे चाचण्यांमध्ये आढळले नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

ई-२० इंधनामुळे ई-१० पेट्रोलच्या तुलनेत वाहनाला अधिक चांगला वेग, सुधारित ड्रायव्हिंग अनुभव आणि सुमारे ३० टक्के कमी कार्बन उत्सर्जन मिळते, असे त्यांनी एका लेखी उत्तरात सांगितले.

देशभरात २० कोटींहून अधिक दुचाकी आणि ३ कोटींहून अधिक पेट्रोल कार इथेनॉलमिश्रित इंधनावर चालत असून यामुळे इंजिन निकामी झाल्याचा किंवा वाहन बंद पडल्याचा कोणताही अधिकृत पुरावा उपलब्ध नसल्याचे गडकरी यांनी सांगितले.तसेच, या पेट्रोलमुळे गंज, झीज किंवा वाहनाच्या आयुष्यात घट झाल्याचे कोणताही निष्कर्ष उपलब्ध नाही असा निष्कर्ष उपलब्ध झालेला नाही, असे त्यांनी नमूद केले.






जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# जंक फुडवर लगाम योग्यच

राज्यातील शाळांच्या ५० मीटर परिसरात जंक फुडच्या विक्री, जाहिराती आणि वितरणावर कठोर बंदी घालण्याचा अन्न व औषध प्रशासनाचा निर्णय हा केवळ प्रशासकीय आदेश नसून विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या संरक्षणासाठी उचललेले अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. उशिरा का होईना दोन कोटी विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून घेतलेला हा निर्णय योग्य वेळी आणि योग्य दिशेने झालेला हस्तक्षेप म्हणावा लागेल. मात्र, या निर्णयाचे खरे यश केवळ नियम बनवण्यात नसून त्याची प्रभावी अंमलबजावणी आणि समाजाच्या सक्रिय सहभागावर अवलंबून आहे. आजची पिढी चव, आकर्षक पॅकेजिंग आणि आक्रमक जाहिरातींच्या प्रभावाखाली मोठ्या प्रमाणावर जंक फुडचे अर्थात निकृष्ट दर्जाच्या पदार्थांचे सेवन करत आहे. 'सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट'च्या सर्वेक्षणानुसार ९ ते १४ वयोगटातील तब्बल ९३ टक्के विद्यार्थी आठवड्यातून एकापेक्षा अधिक वेळा पॅकबंद जंक फुड खातात, तर ६८ टक्के विद्यार्थी नियमितपणे साखरयुक्त शीतपेये पितात. विशेष म्हणजे याबाबत पालकांमध्ये जागरूकता नसल्यामुळे विद्यार्थ्यांसोबत पालकसुद्धा अशा प्रकारच्या पदार्थांचे सेवन करतात. यामुळे अशा आकडेवारीत वाढ झाली आहे. ही आकडेवारी केवळ चिंताजनक नाही, तर भविष्यातील आरोग्य संकटाची पूर्वसूचना आहे. जंक फुडचा परिणाम केवळ शरीरावर होत नाही, तर तो विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि मानसिक विकासावरही गंभीर परिणाम करतो. अतिरिक्त साखर आणि चरबीयुक्त पदार्थांमुळे मेंदूच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे स्मरणशक्ती कमी होणे, एकाग्रता ढासळणे, शिकण्याचा वेग मंदावणे आणि परीक्षेतील कामगिरी खालावणे अशा समस्या निर्माण होतात. शिक्षणाच्या स्पर्धात्मक युगात ही बाब अत्यंत गंभीर आहे. निरोगी शरीरातच निरोगी मन वसते, ही उक्ती आज अधिक अर्थपूर्ण वाटते. याहूनही महत्त्वाचे म्हणजे जंक फुडमुळे लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, यकृताचे विकार यांसारखे आजार लहान वयातच दिसू लागले आहेत. कृत्रिम रंग, रसायने आणि अतिरिक्त साखरेमुळे विद्यार्थ्यांमध्ये चिडचिड, अतिचंचलता, नैराश्य आणि आत्मविश्वासाचा अभाव वाढत असल्याचे अनेक संशोधनांतून स्पष्ट झाले आहे. त्याचप्रमाणे अशा पदार्थांचा थेट नकारात्मक परिणाम मेंदूच्या वाढीवर देखील होतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ आहाराचा नसून संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित आहे. मात्र, केवळ सरकार किंवा अन्न व औषध प्रशासनावर सर्व जबाबदारी टाकून चालणार नाही. शाळांनी आरोग्यदायी कॅन्टीनची उभारणी करणे, पोषणविषयक जनजागृती करणे आणि विद्यार्थ्यांना सकस आहाराचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे. पालकांनीही मुलांच्या हट्टापुढे झुकण्याऐवजी त्यांच्या डब्यात पौष्टिक पदार्थ देण्याची सवय लावली पाहिजे. घरातील आहार संस्कृतीच मुलांच्या सवयी घडवत असते. याचबरोबर विद्यार्थ्यांचीही जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे. निरोगी शरीर आणि तीक्ष्ण बुद्धी ही कोणत्याही यशाची मूलभूत गरज आहे, हे त्यांनी समजून घेतले पाहिजे. फास्ट फुडचा मोह टाळून फळे, दूध, कडधान्ये, भाज्या आणि घरगुती अन्न यांना प्राधान्य देणे ही त्यांच्या स्वतःच्या भवितव्यासाठी आवश्यक गुंतवणूक आहे. आरोग्यदायी सवयी कोणत्याही नियमामुळे नव्हे, तर स्वतःच्या जाणिवेतून निर्माण होतात. विद्यार्थ्यांनी आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी काही मूलभूत गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे. नियमित पौष्टिक आहार घेणे, पुरेसे पाणी पिणे, रोज किमान एक तास व्यायाम किंवा मैदानी खेळ खेळणे, पुरेशी झोप घेणे आणि जंक फुडचे सेवन अपवादात्मक ठेवणे ही प्रत्येक विद्यार्थ्याची जीवनशैली बनली पाहिजे. मोबाईल, टीव्ही आणि सोशल मीडियावरील आकर्षक जाहिरातींच्या प्रभावापेक्षा स्वतःच्या आरोग्याचा विचार करणे हीच खरी शहाणपणाची बाब आहे. आज घेतलेले योग्य आहाराचे निर्णय उद्याच्या निरोगी आणि यशस्वी आयुष्याचा पाया घालतात. शाळांच्या परिसरातील जंक फुडवरील बंदी ही विद्यार्थ्यांच्या आरोग्य रक्षणासाठी महत्त्वाची सुरुवात आहे. मात्र, या निर्णयाला समाजाची साथ मिळाली, पालकांनी जागरूकता दाखवली आणि विद्यार्थ्यांनी स्वतः आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारली, तरच त्याचे अपेक्षित परिणाम दिसतील. अन्यथा एखादा अधिकारी कितीही जागरूक असला तरी त्याचा अपेक्षित परिणाम होत नाही. निरोगी विद्यार्थी म्हणजेच सक्षम समाज आणि समृद्ध राष्ट्र. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ताटातील प्रत्येक घास पौष्टिक, सुरक्षित आणि संतुलित असणे ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक कुटुंबाची, शाळेची आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. आज जंक फुडला नकार देणारा विद्यार्थीच उद्याचा निरोगी, बुद्धिमान आणि सक्षम नागरिक ठरणार आहे.

# प्रखर देशभक्त लोकमान्य टिळक



स्वदेशी, बहिष्कार, शिक्षण आणि स्वराज्य या चतु:सूत्रीचा टिळकांनी नेहमीच पुरस्कार केला. ते हिंदुस्थानातील राजकीय असंतोषाचे जनक तसेच आधुनिक भारताचे एक शिल्पकार होते. 'स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' अशी सिंहगर्जना करणाऱ्या टिळकांनी आपले संपूर्ण आयुष्य भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी ब्रिटिशांशी लढण्यात घालवले. कुशाग्र बुद्धीमत्तेचे, प्रखर देशभक्त, निर्भीड पत्रकार, लेखक आणि स्पष्टवक्ते असणाऱ्या, अन्यायाविरुद्ध पेटून उठणाऱ्या टिळकांनी शिवजयंती आणि गणेशोत्सव या कार्यक्रमांची सुरुवात करून लोकांमध्ये सांस्कृतिक राष्ट्रवाद निर्माण केला. ब्रिटीशांनी 'भारतीय असंतोषाचे जनक' असे बिरुद दिलेल्या टिळकांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि उत्कर्षासाठी 'शिक्षण' ही मुलभूत गरज मानून 'केसरी' आणि 'मराठा' ही वृत्तपत्रे सुरु करून लोकांना संघटीत आणि शिक्षित केले तर 'न्यू इंग्लिश स्कूल' ची स्थापना करून तरुणांना देशप्रेमाची शिकवण दिली.

२३ जुलै १८५६ मध्ये रत्नागिरी येथे लोकमान्यांचा जन्म झाला. पुत्र प्राप्तीसाठी मातेने उपवास आणि कठीण व्रत केले आणि सूर्यदेवाच्या कृपाप्रसादाने जन्मलेल्या या बाळाने ब्रिटिश साम्राज्य शाहीचा अस्त घडवून आणला. लहानपणापासूनच कुशाग्र बुद्धिमत्ता असलेल्या टिळकांचे विचार स्वतंत्र आणि वेगळे होते. गणित हा त्यांचा आवडता विषय. कितीतरी कठीण गणिते ते सहजपणे सोडवत असत. तथापि, स्पष्टवक्तेपणामुळे शिक्षकांना ते आवडत नसत. ते शाळेत असतानाची एक घटना प्रसिद्ध आहे. एकदा शिक्षक वर्गात नसताना काही मुलांनी शेंगा खाऊन टरफले वर्गातच टाकली होती. शिक्षकांच्या हे लक्षात आल्यानंतर त्यांनी रागावून टरफलांविषयी विचारले असता कुणीच स्वत:हून पुढे येईना. तेव्हा त्यांनी वर्गातील सर्व मुलांना टरफले उचलण्यास सांगितले. पण टिळकांनी टरफले उचलण्यास नकार दिला.' मी शेंगा खाल्ल्या नाहीत, मी टरफले उचलणार नाही' असे बाणेदार उत्तर त्यांनी दिले. प्रकृतीने अशक्त असणाऱ्या टिळकांनी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर नियमित व्यायाम आणि पौष्टिक आहार घेऊन प्रकृती बळकट केली आणि सर्व खेळांत प्रथम क्रमांक पटकावला. ते उत्तम मल्ल आणि पोहणारे म्हणून नावाजले गेले. १८७७ मध्ये टिळक गणितात प्रथम वर्गामध्ये बी.ए. झाले. पुढे त्यांनी एल.एल.बी. ही पदवी संपादन केली.

तथापि नोकरी न करता आगरकरांच्या सहकार्याने १८८० मध्ये 'न्यू इंग्लिश स्कूल' ची स्थापना केली. लोकांना संघटीत करून इंग्रजांच्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी त्यांना तयार केले. बालविवाहाला विरोध, विधवाविवाह आदी सामाजिक सुधारणांसाठी त्यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध संघर्ष केला. नंतरच्या काळात दोघांमध्ये तात्त्विक मतभेद झाल्याने टिळकांनी कर्जासह 'केसरी'चे संपादकपद स्वतःकडे घेतले. टिळकांचे अग्रलेख हाच 'केसरी'चा आत्मा होता. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय', 'उजाडले पण सूर्य कुठे आहे,' 'टिळक सुटले पुढे काय', 'प्रिन्सिपॉल, शिशुपाल की पशुपाल', 'टोणग्याचे आचळ', 'हे आमचे गुरूच नव्हेत', 'बादशहा ब्राह्मण झाले', 'पुनश्च हरि ॐ!' हे त्यांचे काही प्रसिद्ध अग्रलेख. टिळक हे सुरवातीपासूनच जहालमतवादी असल्याने त्यांनी १८९० मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश करताच पक्षाच्या मवाळ विचारसरणीला विरोध केला. काँग्रेस पक्षातील लाला लजपतराय, आणि बिपिनचंद्र पाल यांची राजकीय मते त्यांच्याशी जुळणारी होती. यामुळे या त्रिकुटाला लाल-बाल-पाल असे नामकरण मिळाले व पुढे हे त्रिकुट देशाच्या राजकारणात बरेच गाजले. मंडालेच्या तुरुंगात असताना त्यांनी लिहिलेला 'गीतारहस्य' हा ग्रंथ अक्षय विचारधन असून त्यात त्यांनी ज्या कर्मयोगाचा पुरस्कार केला आहे तो प्रत्यक्ष जीवनात त्यांनी आचरणात आणला.

लोकमान्यांच्या गणिती बुद्धिमत्तेचा आणखी एक चमकदार पैलू म्हणजे त्यांनी ज्योतिर्गणिताच्या सहाय्याने निश्चित्त केलेला वेदांचा काळ. जर्मन पंडित मैक्समुल्लर ने इ.स. पूर्व १२०० च्या सुमारास वेद लिहिले गेले असावेत, असा सिद्धांत मांडला. तथापि, लोकमान्यांचे गणिती मन हे कबूल करीत नव्हते. शरद संपातात सूर्य आपल्या डोक्यावर असताना मकरवृत्तातून तो उत्तरेकडे सरकतो, प्राचीन ग्रंथातील शरद संपात कोणत्या नक्षत्रात आहे त्याचे उल्लेख व संदर्भ, ऋग्वेदातील शरद संपात मृगशीर्षात आहे असा उल्लेख, मृगशीर्षला अग्रहायन ही पर्यायी संज्ञा , जिला ग्रीक भाषेत 'ओरायन' म्हणतात तसेच श्रीकृष्णाने भगवद्गीतेतील 'मासानां मार्गशीर्षोहम' म्हंटल्याचे लोकमान्यांच्या लक्षात आले आणि त्यांना 'मृगशीर्ष' आणि 'मार्गशीर्ष' यातील साम्य इतके भावले की त्यांनी ज्योतिर्गणिताच्या आधारे वेदांचा काळ इ.पू. ४००० वर्षापासून ते इ.पू. २५०० वर्षापर्यंत असावा, असा निष्कर्ष काढला. पुढे लोकमान्यांनी या संशोधनावर आधारित 'ओरायन' हा ग्रंथ लिहिला, जो विद्वज्जनांनी नावाजला. या उदाहरणावरून गणिताचा चौफेर उपयोग कसा करता येतो ते लोकमान्यांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांच्या गणितप्रेमाचा ध्यास सर्वांनी घेतल्यास तीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.


लोकसंग्रहाची दृष्टी राखून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीला समाजातील सर्व थरांतील लोकांचे अधिष्ठान मिळवून दिले. गांधीजींच्या राजकीय-सांस्कृतिक कार्याला अनुकूल अशी पार्श्वभूमी लोकमान्यांनी निर्माण केली, असे म्हंटले तर उचित ठरेल. टिळकांनी भारतीय जनतेला एकत्र आणून आपल्या प्रखर विचारांनी सर्वांसमोर आदर्श निर्माण केला. म्हणूनच भारताच्या इतिहासात टिळक हे नाव सुवर्ण अक्षरात कोरले गेले आहे. त्यांना विनम्र आदरांजली !

**-प्रा. विजय कोष्टी,**
कवठेमहांकाळ, जि. सांगली
मो. ९४२३८२९११७

# अणणाभाऊ साठे यांचे सामाजिक कार्य

अनिष्ट धर्माच्या आचरणाने माणसांना हीन समजणे हा धर्म नसून तो एक रोग आहे असे अणणाभाऊ साठे यांचे स्पष्ट मत होते.

मराठी साहित्यीक ,समाज सुधारक, लोककवी शाहीर अणणाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे झाला. त्याचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व प्रेरणा देणारे आहे. त्यांनी तमाशा, लावणी आणि पोवाडे यांचा उपयोग समाज प्रबोधनासाठी केला. अणणाभाऊ साठे यांचे साहित्य हे दलित ,कामगार आणि शोषित समाजाच्या जीवनावर केंद्रित आहे. त्यांनी जातीयवाद, वर्गीय शोषण आणि लैंगिक असमानता यांच्याविरुद्ध लढा दिला. त्यांच्या लेखनाचा प्रेरणास्त्रोत शोषित आणि उपेक्षित होते .कुठलेही औपचारिक शिक्षण नसलेले अणणाभाऊ साठे हे प्रख्यात लेखक झाले हे मराठी साहित्यातील एक महत्वपूर्ण आश्चर्य आहे. सर्वसामान्य गरीब, दलित, बहुजन वर्गाच्या उद्धारासाठी आयुष्यभर आपल्या लेखन साहित्यातून जनजागृती व प्रबोधनाचे कार्य त्यांनी केले. ३५ कादंबऱ्या १५ लघुकथा संग्रह १२ पटकथा, एक नाटक असे त्यांचे लेखन प्रचंड कार्य आहे .त्यांच्या संपूर्ण लेखन शैलीवर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. त्यांचे सामाजिक विचार समाजातील विषमतेवर आणि शोषणावर आधारित होते. त्यांनी भारतीय समाजाला पसरलेल्या जातीयतेच्या जोखडातून समाजाला मुक्त करण्यासाठी सामाजिक व शैक्षणिक विचाराची मशाल हाती घेतली .



अणणाभाऊ साठे यांचा सामाजिक विचार हा समाजातील विषमतेवर आणि शोषणावर आधारित होता् त्यांनी भारतीय समाजाला जातीयतेच्या पसरलेल्या जोखडातून मुक्त करण्यासाठी सामाजिक व शैक्षणिक विचारांची मशाल हातात घेऊन तत्कालीन सामाजिक व्यवस्थेच्या अस्मितेला उजाळा दिला. अणणाभाऊ साठे यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले ,छत्रपती शाहू महाराज ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव होता. सनातनी समाज व्यवस्थेला धडा शिकवण्यासाठी त्यांनी आपल्या कार्याची धुरा सामाजिक न्याय, समता व शिक्षण या त्रिसूत्रीवर उभी केली. त्यांनी संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा यासाठी सामाजिक चळवळीलाही हातभार लावलेला दिसून येतो.

अणणाभाऊ साठे यांनी दलितांचे प्रभावी नेतृत्व केले. त्यांनी समाजातील निरक्षरता आणि अंधश्रद्धेवर कडाडून आघात केला. तळागाळातील दलित, पीडित समाजाला सामाजिक दर्जा मिळावा म्हणून त्या काळात पसरलेल्या जातीयतेच्या दर्दीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी जातीव्यवस्थेवर प्रकाश टाकला. अंधश्रद्धेवर आघात करताना अणणाभाऊ साठे म्हणतात,, पृथ्वी ही शेषनागावर नसून कामगार आणि कष्टकऱ्यांच्या तळहातावर उभी आहे

श्रमाचे महत्व विषद करताना अणणाभाऊ साठे म्हणतात श्रम हीच पूजा होय .श्रमातून मानवी विचार व स्वास्थ्य सुधारते .श्रम हा मानवी जीवनाचा आधार आहे .कष्ट करणे मानवी जीवनाचे मूल्य आहे आणि ते प्रत्येकाने केले पाहिजे .

अणणाभाऊ साठे यांनी समाज जागृतीमध्ये खूप महत्त्वाची भूमिका पार पाडलेली दिसून येते. त्यांनी चुकीच्या रुढी, प्रथा, परंपरा यांचा कडाडून विरोध केला तसेच लोककलेच्या माध्यमातून म्हणजेच तमाशा द्वारे जनजागृतीची पताका हाती घेतली. समाजातील छोट्या-मोठ्या विषयातून समाज जागृतीचे कार्य करण्याचे कार्य अणणाभाऊ साठे यांनी केले .

अणणाभाऊ साठे यांनी औपचारिक शिक्षण न घेता आपल्या विचारातून जनतेला शिक्षणाचे महत्व पटवून दिल्याचे दिसून येते ते म्हणतात शिक्षण हे पुस्तकापुरते मर्यादित न राहता सार्वभौम व्हावे. यासाठी व्यक्तीच्या कलाविकासावर भर दिला जावा .नवनवीन प्रयोगातून व्यक्ती हा सूजलाम सुफलाम होतो. प्रयोगशीलता मानवी मेंदूला चालना देते हे अणणाभाऊ साठे यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे .अणणाभाऊ साठे यांनी अनेक कादंबऱ्या, कथा, लघुकथा असा विचारात्मक व प्रबोधनात्मक साहित्याचा जन्म भारतीय समाजामध्ये घालून दिला .फकीरा, वारणेचा वाघ ,टिळा लावते मी रक्ताचा, डोंगराचा राजा इत्यादी साहित्यातून शैक्षणिक विचार मांडण्याचे कार्य अणणाभाऊ साठे यांनी केले्

अणणाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केवळ सामाजिक समस्येचे चित्रण आणि समाजाचे वास्तवाचेच चित्रण केले असे नाही तर आर्थिक विचार हीच जनसामान्यापर्यंत पोहोचवण्याचे काम अणणाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केले अणणाभाऊ साठेंवर कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. त्यांनी समाजातील गरीब, शोषित, पिडीत ,कष्टकरी लोकांच्या आर्थिक समस्यांवर प्रकाश टाकला. भांडवलशाही व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला आणि पीडित शोषित समाज ही समाजाचा अविभाज्य घटक आहे आणि त्यांचे आर्थिक सक्षमीकरण झाले पाहिजे हा विचार आपल्या साहित्यातून आणि कृतीतून मांडलेला दिसून येतो.

अणणाभाऊ साठे यांनी भांडवलशाही व्यवस्थेवर तीव्र नाराजी व्यक्त केलेली दिसून येते भांडवलशाही व्यवस्थेतील विषमतेवर सर्वप्रथम टिका अणणाभाऊ साठे यांनी केली. श्रमिकास केंद्रबिंदू मानून त्यांनी त्यांच्यावर आपला देश चालतो त्यांना मिळणारे वेतन अल्पशा प्रमाणात असून त्यांच्या श्रमाच्या घामावर जगणारी समाजव्यवस्था म्हणजे भांडवलशाही, जमीनदारी व सावकारी व्यवस्थे विरुद्ध त्यांनी बंड केले .

अणणाभाऊ साठेंनी आपल्या साहित्यातून आणि कृतीतून शोषणाविरुद्ध आवाज उठवण्याचा दिसून येतो ते म्हणतात ,हे आझादी झूठी, है देश की जनता भूखी है हा क्रांतिकारी नारा देऊन कामगारांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक तसेच राजकीय विषमते विरुद्ध जन आंदोलन पेटवले त्यांनी शोषित पीडित आणि वंचित घटकांना मुख्य मानून आपल्या साहित्यात शोषणाविरुद्ध आवाज उठवला कामगारांचे हक्क व त्यांच्या शोषणाविरुद्ध अणणाभाऊ साठे यांनी लढा दिला. कष्टकरी शेतमजूर विरुद्ध सावकार, मालक विरुद्ध मजूर असे ज्वलंत प्रश्न त्यांनी जनतेसमोर मांडले जनतेच्या हक्कांना वाचा फोडण्याचे कार्य अणणाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून केल्याचे दिसून येते .

परिवर्तन ही काळाची गरज आहे असे अणणाभाऊ साठे यांना वाटायचे त्यांनी तमाशा या लोककलेच्या माध्यमातून समाजाला बदलण्याचे ध्येय उराशी बाळगून पारंपारिक अंधश्रद्धा, अज्ञान, विषमता व गुन्हेगारी तसेच समाजात पसरलेली बुवाबाजी, देववादावर टीका केली. आपल्या साहित्यातून जनसामान्याला आधार दिला व आपल्या साहित्यातून समाज परिवर्तनाची मशाल पेटवल्याचं काम अणणाभाऊ साठे यांनी केलेले दिसून येते. अशा या थोर समाजसुधारकास आज जयंती निमित्त विनम्र अभिवादन

**-डॉ. सत्यभामा जाधव**
सदस्य बाल कल्याण समिती
नांदेड
मो.नं् .९४०३७४४७१५

# साहित्यरत्न अणणाभाऊ साठे आणि 'लेखन प्रेरणा दिन'

मराठी साहित्य विश्वाला आपल्या अफाट प्रतिभेने समृद्ध करणारे, शोषितांच्या आणि कष्टकऱ्यांच्या वेदनांना वाचा फोडणारे युगपुरुष म्हणजे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अणणाभाऊ साठे. आपल्या समृद्ध आणि झुंजार लेखणीच्या जोरावर त्यांनी मराठी साहित्याला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. त्यांच्या याच अद्वितीय साहित्यिक योगदानाचे स्मरण म्हणून महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने १ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे. हा दिवस केवळ एका महान लेखकाची आठवण काढण्याचा नसून, नव्या पिढीला लेखनाची आणि वाचनाची प्रेरणा देणारा एक दिशादर्शक उपक्रम आहे.

साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अणणाभाऊ साठे यांचे आयुष्य हे संघर्ष आणि स्वाभिमानाचे ज्वलंत उदाहरण होते. औपचारिक शिक्षणाची कोणतीही भक्कम पार्श्वभूमी नसतानाही त्यांनी आपल्या अनुभवाच्या, निरीक्षणाच्या आणि अथांग प्रतिभेच्या बळावर जे साहित्य निर्माण केले, ते थक्क करणारे आहे. 'फकिरा', 'वैजयंता', 'माकडीचा माळ', 'आवडी' यांसारख्या प्रसिद्ध कादंबऱ्या, अनेक कथासंग्रह, लोकनाट्ये आणि पोवाडे यांद्वारे त्यांनी उपेक्षित समाजाचे वास्तव मांडले. त्यांचे साहित्य केवळ करमणुकीचे साधन नव्हते, तर ते अन्यायाविरुद्धचा एक लढा होता.

जग बदल घालूनी घाव, मज सांगून गेले भीमराव ही त्यांची ओळ त्यांच्या विचारसरणीची धार दाखवून देते. अणणाभाऊंच्या लेखणीची ताकद इतकी अफाट होती की, त्यांच्या रचनांचे भाषांतर रशियनसह जगातील अनेक भाषांमध्ये झाले आणि त्यांनी आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवली. 'लेखन प्रेरणा दिन' साजरीकरणामागील पार्श्वभूमी महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट हा दिवस विद्यापीठे, महाविद्यालये आणि शिक्षण संस्थांमध्ये 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे युवा पिढीमध्ये वाचन आणि लेखनाची आवड निर्माण करणे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना आणि विचारक्षमतेला वाव देणे.

आजच्या काळात 'लेखन प्रेरणा दिना'चे महत्त्व आजच्या डिजिटल युगात, जिथे सोशल मीडियामुळे तरुण पिढीचा पुस्तकांशी आणि सखोल लेखनाशी संपर्क कमी होत चालला आहे, तिथे 'लेखन प्रेरणा दिन' अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो. लेखन हे केवळ शब्द रचणे नाही, तर ते विचारांचे प्रगटीकरण असते. अणणाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून समाजाला दिशा दिली. आजच्या तरुण पिढीलाही आपले विचार, समस्या आणि स्वप्ने लेखणीच्या माध्यमातून मांडता यावीत, यासाठी हा दिवस एक मोठी प्रेरणा ठरतो.

साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अणणाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीने मराठी साहित्यविश्वात आणि मानवी मनांवर जी मोहिनी घातली, ती अजरामर आहे. १ ऑगस्ट हा 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करणे ही अणणाभाऊंना दिलेली खरी आणि अर्थपूर्ण आदरांजली आहे. या निमित्ताने प्रत्येक विद्यार्थ्याने आणि वाचकाने त्यांच्या साहित्यातून प्रेरणा घेऊन आपल्यातील विचार आणि प्रतिभेला लेखणीचे रूप देण्याचा संकल्प करायला हवा.

**-सोनू दरेगावकर,**
नांदेड
संपर्क: ७५०७१६१५३७

# लोकनेते आ. आनंदराव पाटील बोंढारकर

भारतीय राजकारणात अनेक नेते उदयास येतात आणि काळाच्या ओघात विस्मृतीतही जातात. मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांची ओळख केवळ राजकारणापुरती मर्यादित राहत नाही. ती जनतेच्या विश्वासाची, संघर्षाची आणि लोकसेवेची ओळख बनते. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर हे असेच एक जनसामान्यांच्या मनात घर करणारे लोकनेते आहेत.

कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना, केवळ निस्वार्थ लोकसेवा, अथक परिश्रम आणि जनतेच्या आशीर्वादाच्या बळावर ग्रामपंचायतीच्या सदस्यपदापासून ते महाराष्ट्र विधानसभेपर्यंतचा त्यांनी केलेला प्रवास प्रेरणादायी आणि अनुकरणीय आहे.

खरे नेतृत्व हे मोठ्या कार्यालयांत किंवा सत्तेच्या दालनांत घडत नाही. ते गावाच्या मातीत, जनतेच्या सुख-दुःखात आणि त्यांच्या विश्वासातून घडते. ही बाब आमदार आनंदराव बोंढारकर यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवली आहे.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या आनंदराव बोंढारकर यांनी सार्वजनिक जीवनाची सुरुवात गावाच्या विकासासाठी स्वतःला झोकून देत केली. गावातील प्रत्येक प्रश्न स्वतःचा समजून त्यावर उपाय शोधण्याची त्यांची वृत्तीच त्यांच्या नेतृत्वाचा पाया ठरली.

सुमारे २५ वर्षे बोंढार गावाचे सरपंच म्हणून त्यांनी विकासाचे नवे आदर्श निर्माण केले. पाणीपुरवठा, रस्ते, मूलभूत सुविधा, ग्रामविकास आणि पारदर्शक प्रशासन या क्षेत्रांत त्यांनी केलेल्या कामांमुळे ग्रामस्थांचा विश्वास दिवसेंदिवस दृढ होत गेला. एका सरपंचाने गावाचा सर्वांगीण विकास कसा साधावा, याचे आदर्श उदाहरण त्यांनी घालून दिले.



सरपंचपदापासून विधानसभेपर्यंतचा प्रवास कधीच सहज नव्हता. प्रत्येक टप्प्यावर राजकीय आव्हाने, विरोधकांचा सामना आणि अनेक संकटे त्यांच्या वाट्याला आली. मात्र त्यांनी संघर्षाला कधीही पाठ फिरवली नाही. जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणे, कार्यकर्त्यांची मजबूत फळी तयार करणे आणि प्रत्येक नागरिकाच्या सुख-दुःखात सहभागी होणे, या गुणांमुळे त्यांनी जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. ते केवळ निवडून आलेले प्रतिनिधी नसून, सामान्य माणसाचा विश्वास संपादन करणारे लोकनेते ठरले.

ग्रामपंचायतीपासून सुरू झालेल्या लोकसेवेची दखल जनतेने घेतली आणि त्यांना नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून निवडून दिले. विधानसभेत पोहोचल्यानंतरही त्यांच्यातील 'गावचा सरपंच' कधीच बदलला नाही. मतदारसंघातील रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, शेती आणि विकासाशी संबंधित विविध प्रश्न त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले. शासनाच्या दालनात सामान्य नागरिकांच्या हक्कासाठी सातत्याने आवाज उठवणारा नेता म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

सत्तेच्या सर्वोच्च व्यासपीठावर पोहोचल्यानंतरही जमिनीशी नाळ कायम ठेवणारे आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सदैव उपलब्ध असणारे नेतृत्व म्हणजे आमदार आनंदराव बोंढारकर.

राजकारणासोबत समाजकारणाची सांगड घालणे ही त्यांची कार्यशैली आहे. वाढदिवस, सार्वजनिक कार्यक्रम किंवा सामाजिक उपक्रम यांना त्यांनी केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित ठेवले नाही.

वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक उपक्रम, सामाजिक जनजागृती आणि लोकहिताच्या विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजात विधायक संस्कार रुजवण्याचा प्रयत्न केला. लोकांसाठी आणि लोकांमुळे हे तत्त्व त्यांनी आपल्या प्रत्येक कृतीतून जपले आहे.

आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांचा ग्रामपंचायत ते विधानसभेपर्यंतचा प्रवास हा केवळ एका राजकीय व्यक्तिमत्त्वाचा प्रवास नसून, तो संघर्ष, जिद्द, प्रामाणिकपणा आणि जनतेवरील निस्सीम प्रेमाचा इतिहास आहे. त्यांचा जीवनप्रवास प्रत्येक कार्यकर्त्याला आणि युवकाला प्रेरणा देणारा आहे. तो शिकवतो की, निष्ठा, प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर कोणतीही मोठी पार्श्वभूमी नसतानाही यशाचे शिखर गाठता येते.

जनतेशी कायम जोडलेले नेतृत्वच दीर्घकाळ लोकांच्या मनात स्थान मिळवते. गावाच्या विकासातूनच राज्याच्या विकासाचा मार्ग निर्माण होतो. आज अभीष्टचिंतनाच्या निमित्ताने त्यांच्या आतापर्यंतच्या कार्याचा गौरव करताना, त्यांच्या पुढील सार्वजनिक जीवनासाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिक व्यापक जनसेवेच्या कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**-श्याम पाटील वानखेडे**
शिवसैनिक, नांदेड
मो. ९८९०३४४६३५

# आ. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त सिडको, हडको परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –कंधार, लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने सिडको–हडको परिसरात सत्कार सोहळा, बालाजी मंदिर हडको येथे महाअभिषेक व महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने जुना कौठा, सिडको, हडको परिसरात १ ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रारंभी सकाळी ९ वाजता जुना कौठा येथील बालाजी मंदिर येथे महाआरती व १५ लक्ष रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन तर विकास आढाव यांच्या निवासस्थानी जुना कौठा येथे सदिच्छा भेट, साईबाबा मंदिर जुना कौठा येथे विश्वस्त मंडळाचे दिलीप कंदकुर्ते यांच्या वतीने महाआरती तर हडको येथील बालाजी मंदिर येथे अभिषेक व महाआरतीचे आयोजन व सत्कार संग्राम मोरे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.

संतोष वर्मा यांच्या हडको येथील वात्सल्य नगर सोसायटीतील निवासस्थानी सत्कार सोहळा व माधवराव लोंढे, पंजाबराव काळे यांच्या वतीने सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक संग्राम मोरे यांनी केले आहे.

# आ. बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त वसरणी येथे १०१ वृक्ष लागवड



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने शिवसेना सिडको शहरप्रमुख सुहास खराणे पाटील यांच्या वतीने १ ऑगस्ट रोजी अंध विद्यालय वसरणी येथे अन्नदान वाटप व वसरणी परिसरातील विविध भागांत १०१ वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने विधानसभा मतदारसंघातील अनेक विविध भागात ११ हजार वृक्ष लागवड व मनपाच्या हद्दीत असलेल्या प्रभाग क्रमांक १९ मधील वसरणी भागात १०१ वृक्षलागवड सिडको शहर प्रमुख सुहास पाटील खराणे यांच्या वतीने करण्यात येणार आहे. वसरणी येथील अंध विद्यालय येथे अन्नदानाचे वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, तालुका प्रमुख उध्दव पाटील शिंदे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# तलवारीसह फिरणाऱ्या तडीपार गुंडाची किनवट पोलिसांकडून धिंड



**किनवट (प्रतिनिधी)** –दोन जिल्ह्यातून तडीपारीचा आदेश असताना तो आदेश झुगारून हातात लोखंडी तलवार घेऊन किनवट शहरात दहशत माजवण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या एका २२ वर्षीय तरुणाला किनवट पोलिसांनी शुक्रवारी दुपारी अटक केली. त्यानंतर त्याची शहराच्या मुख्य रस्त्यावरून धिंड काढण्यात आली.

शहरातील गंगानगर येथील रहिवाशी असलेल्या विष्णू मेटकर याला न्यायालयाच्या आदेशानुसार काही दिवसांपूर्वी नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातून २ वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले होते. तरीपण तो हद्दपारीचा आदेश झुगारून किनवटमध्येच राहात होता. शुक्रवारी दि. ३१ रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास तो किनवट शहरातील गंगानगर भागात हातात लोखंडी तलवार घेऊन फिरत होता. तो शहरात चोऱ्या व घरफोड्या करण्याच्या उद्देशाने व नागरिकांमध्ये दहशत पसरवण्याच्या हेतूने आला, अशी माहिती पोलीस निरीक्षक गणेश कराड यांना मिळाली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक कराड व त्यांचे सहकारी गंगानगरात पोहोचले. पोलीस अंमलदार चंद्रशेखर मुंडे व इतर कर्मचाऱ्यांनी विष्णू मेटकर याला ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी गंगानगरपासून ते शहराच्या शिवाजी चौकापर्यंत त्याची धिंड काढली. तलवार घेऊन दहशत माजविणे व हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी जमादार चंद्रशेखर मुंडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी विष्णू यादव मेटकर याच्याविरोधात महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ आणि भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हिमायतनगर खून प्रकरण: मुख्य आरोपी गुरुमहाराज स्वामीला जन्मठेप

**भोकर (प्रतिनिधी)**– हिमायतनगर येथील घारापूर फाटा खून प्रकरणात भोकरचे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश मोहम्मद नासीर मोहम्मद सलीम यांनी शुक्रवार, दि. ३१ जुलै रोजी महत्त्वपूर्ण निकाल दिला. हिमायतनगर ठाण्यात गु.र.नं. ०४/२०२२, भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, ३२६, ३२४, १०९, ५०४, ५०६, ३४ अन्वये दाखल असलेल्या सत्र प्रकरण क्र. ४०/२०२२ मध्ये न्यायालयाने मुख्य आरोपी गुरुमहाराज शिवदास स्वामी (वय ३१ वर्षे, रा. पळसपूर पॉइंट, हिमायतनगर, नांदेड) यास दोषी ठरवून जन्मठेप व १ हजार द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली आहे.

तर या गुन्ह्यातील इतर तीन आरोपींना संशयाचा फायदा देत निर्दोष मुक्त करण्यात आले. सदर मुख्य आरोपी गुन्हा दाखल झाल्यापासून न्यायालयीन कोठडीत होता. दि. ५ जानेवारी २०२२ रोजी दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास हिमायतनगर येथील घारापूर फाटा, मध्यवर्ती बँकेजवळ गाडीत प्रवासी भरण्याच्या कारणावरून वाद झाला. यातून आरोपींनी फिर्यादी शेख नदीम शेख जलील, वय २० वर्षे, रा. रहिम कॉलनी, हिमायतनगर व त्यांच्या भावावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केला.

या हल्ल्यात शेख इम्रोज शेख जलील (वय २७ वर्षे, रा. हिमायतनगर) यांना गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता, तर फिर्यादीही गंभीर जखमी झाले होते. या घटनेनंतर हिमायतनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ०४/२०२२ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक बी. जी. महाजन, पोलीस स्टेशन हिमायतनगर यांनी अत्यंत कौशल्याने केला. तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा, जखमी व साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय पुरावे, न्यायवैद्यक अहवाल, शस्त्र जप्ती, कपड्यांची जप्ती तसेच इतर वैज्ञानिक पुरावे संकलित करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. तपासात उपलब्ध करून दिलेल्या भक्कम पुराव्यांच्या आधारे शासन पक्षाने आरोपीविरुद्ध दोष सिद्ध केला.

# बँक खाते भाड्याने देणे म्हणजे गुन्ह्यात सहभागी होणे –एसपी डॉ. निलाभ रोहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, सायबर गुन्हेगार आता फसवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी सामान्य नागरिकांच्या बँक खात्यांचा गैरवापर करत असल्याचे तपासात निष्पन्न होत आहे. कमी वेळात जास्त पैसे मिळवून देण्याचे आमिष, कमिशन, नोकरी, ऑनलाइन व्यवसाय किंवा खाते भाड्याने घेण्याच्या नावाखाली अनेकांची फसवणूक केली जात आहे. नागरिकांनी अशा आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी केले आहे.

नांदेड पोलिसांच्या सायबर सेलमार्फत NCRP Portal व SMNVY Portal वर प्राप्त माहितीची सातत्याने पडताळणी करण्यात येत आहे. या तपासामध्ये फसवणुकीची रक्कम जमा झालेली अनेक बँक खाती आढळून आली असून, संबंधित खातेदारांनी स्वतःचे बँक खाते, एटीएम कार्ड, चेकबुक किंवा इंटरनेट बँकिंग सुविधा इतरांच्या वापरासाठी दिल्याचे समोर आले आहे. अशा खात्यांचा वापर करून सायबर गुन्हेगार देशभरातील नागरिकांची फसवणूक करीत असल्याचे उघड झाले आहे. त्याअनुषंगाने येथील सायबर पोलीस ठाण्यात दि. ३१ जुलै रोजी दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



सायबर गुन्हेगार सोशल मीडिया, टेलिग्राम, व्हॉट्सॲप किंवा इतर माध्यमातून संपर्क साधून खालील आमिषे देतात.

तुमच्या खात्यात पैसे जमा होतील, ते पुढे पाठवा, महिन्याला ठराविक कमिशन मिळेल, बँक खाते भाड्याने द्या, KYC अपडेट, वर्क फ्रॉम होम, ऑनलाईन पार्ट-टाईम जॉब. अनेक नागरिक याला बळी पडून स्वतःचे बँक खाते वापरण्यास देतात. अशा प्रकारे वापरलेले खाते हे 'म्युल अकाउंट' म्हणून ओळखले जाते. या खात्यांचा वापर सायबर गुन्ह्यातील फसवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी केला जातो.

नागरिकांनी हे लक्षात घ्यावे की, माझ्या खात्यात पैसे आले, पण मी फसवणूक केली नाही असे सांगून जबाबदारी टाळता येत नाही. आपल्या बँक खात्याचा वापर गुन्ह्यासाठी होऊ दिल्यास संबंधित खातेदाराविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल होऊ शकतो.

## टी.सी. हरवली

माझी जेठेवाड शिवराज व्यंकटी या नावाची बारावी विज्ञान पासची टी.सी. व गुणपत्रक नांदेड ते बरबडा बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. जेठेवाड शिवराज व्यंकटी मु.पो. बरबडा ता. नायगाव जि. नांदेड मो.नं. ७०६६३९३२०२**

## कागदपत्र हरवले


माझी पायल प्रल्हाद चव्हाण या नावाचे दहावी पासचा मार्कमेमो व सनद, बारावी पास मार्कमेमो व सदन, जात प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॅश्नलिटी प्रमाणपत्र, जी.जी.सी. टायपिंग ३० व ४० इंग्रजी व मराठी ३० प्रमाणपत्र ईत्यादी हिमायतनगर ते नांदेड प्रवासात हरवले आहे. तरी कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती.

**संपर्क पत्ता – पायल प्रल्हाद चव्हाण हुतात्मा कॉलेज जवळ, हिमायतनगर नांदेड मो.नं. ८०१०६६०१९४**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## टी.सी. हरवली

माझी पाटील अमरदीप उमेश नावाची १० वी व १२ पासची टीसी व १० वी १२ चे गुणपत्रक मुक्रमाबाद-देगलूर प्रवासात हरवले आहेत कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा,

संपर्क पत्ता
पाटील अमरदीप उमेश
मु.पो.गोजेगाव ता.मुखेड जि.नांदेड
मो.न.९६०४४५८७३३

## टी.सी. हरवली

माझी विकास चंद्रप्रकाश चौधरी या नावाची इंजिनिअरिंग अँड टॅक्नॉलॉजी इलेक्ट्रीक इंजिनिअरिंग या वर्गा टी.सी. वजिराबाद चौक ते गुरूद्वारा चौक प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क मोबाईल**
**विकास चंद्रप्रकाश चौधरी**
**रा. नवी कौठा, नांदेड**
**मो.नं. ७०२८६२२२३५**

## टी.सी. हरवली

माझी कृष्णा सखाराम गिरी या नावाची दहावी पासची टी.सी. वसमत ते नांदेड बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क मोबाईल**
**कृष्णा सखाराम गिरी**
**रा. वसमत जि. हिंगोली**
**मो.नं. ९५७९७१४०१४**

## जाहीरप्रगटन

भोकर येथील सह. दि. न्यायालय व. स्तर, भोकर यांच्या न्यायालयात

समक्ष श्री. आर.आर. पत्की साहेब दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर जि. नांदेड

किरकोळ अर्ज क्र. १८४/२०२६

१) रामराव पि. किसन राठोड
वय- ७० धंदा- शेती
रा. डोरली तांडा ता. भोकर जि. नांदेड

२) लक्ष्मीबाई भ्र. उत्तमराव चव्हाण
वय- ६० धंदा- घरकाम
रा. चिदगिरी ता. भोकर जि. नांदेड

३) सावित्राबाई भ्र. देवराव चव्हाण
वय- ५८ धंदा- घरकाम
रा. शिवाजी नगर, रेल्वे गट मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड

विरूध्द

निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट १८२७ च्या कलम ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत रुख्माबाई भ्र. किशन राठोड यांचे वारस आहेत. मयत रुख्माबाई भ्र. किशन राठोड यांचा मृत्यू दिनांक २६/०९/२०२५ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत:ता न्यायालयात दिनांक १६/०९/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर

अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर

## जाहीर प्रगटन

(भोकर येथील **श्री. आर. एस. इरले,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर यांच्या न्यायालयात)

**दिवाणी किरकोळ अर्ज क. १८५/२०२६**

**अर्जदार** — १.सावित्राबाई भ्र. मधुकर चव्हाण,
वय— ४२ वर्षे, व्यवसाय— घरकाम,
२.सचिन पि. मधुकर चव्हाण,
वय— २१ वर्षे, व्यवसाय—शिक्षण,
३.वैशाली पि. मधुकर चव्हाण,
वय— १९ वर्षे, व्यवसाय—शिक्षण,
४.बंटी पि. मधुकर चव्हाण,
वय— १६ वर्षे, व्यवसाय—शिक्षण,
अपाक अर्जदार क. १ आई सावित्राबाई भ्र. मधुकर चव्हाण,
अर्जदार क. १ ते ४ रा. चिदगीरी सिताराम नाईक तांडा ता. भोकर जि. नांदेड.
५.सोनाली भ्र. बालाजी आडे,
वय— २५ वर्षे, व्यवसाय—घरकाम,
रा. लोहा तांडा ता. हदगांव जि. नांदेड.

विरूध्द

**गैरअर्जदार** — निरंक

**विषय—** कलम ०३ मुंबई रेग्युलेशन VIII 1827 कायद्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत...

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की, मयत हे अर्जदार क. १ यांचे पती व अर्जदार क. २ ते ५ यांचे वडील आहेत. मयत नामे **मधुकर सिताराम चव्हाण** हे दिनांक ०४/०७/२०२६ रोजी रेणुकाई मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, एल आई सी ऑफीसमागे, महाराणा प्रताप चौक जवळ नांदेड ता. जि. नांदेड येथे मयत झाले. अर्जदार क. १ ते ५ हेच मयत नामे **मधुकर सिताराम चव्हाण** यांचे कायदेशीर वारस आहेत, असे वारसांचे म्हणणे आहे.

मयत नामे **मधुकर सिताराम चव्हाण** यांचे अर्जदार क. १ ते ५ हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क. १ ते ५ यांना मयताच्या मृत्यु पश्चात विविध शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी वारसा हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

हे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वत: अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही, असे समजुन अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल. यानी नोंद घ्यावी.

आज दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक
दिवाणी न्यायालय क. स्तर, भोकर

अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, भोकर

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
### जाहिरात प्रगटन
### (नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, संतोषी अशोक हिवराळे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५७८), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (...) मालमत्ता नं. (ई-४६३/३१) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (१३६८/५) साईज पूर्व-पश्चिम ..... मीटर, दक्षिण-उत्तर ...... मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ९,
पश्चिमेस : रस्ता ,
दक्षिणेस : प्लॉट नं. २, उत्तरेस : प्लॉट नं. ४.

श्री अमित माधवराव कदम, साहेबराव भुजंगराव कदम यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
### जाहिरात प्रगटन
### (नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, आनंद दत्तात्रय डांगे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५२५), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (६३) मालमत्ता नं. (ई-३१८) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (१५२८) साईज पूर्व-पश्चिम १३.४३ मीटर, दक्षिण-उत्तर ९.१५ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : रस्ता,
पश्चिमेस : प्लॉट नं. ५८,
दक्षिणेस : प्लॉट नं. ६२, उत्तरेस : प्लॉट नं. ६४.

श्री अतुल प्रतापचंद्र देशपांडे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
### जाहिरात प्रगटन
### (नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, परमेश्वर मारोती पिटलेवाड यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (३६), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (...) मालमत्ता नं. (१७९९) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (१५३५) साईज पूर्व-पश्चिम ९.१४ मीटर, दक्षिण-उत्तर १२.१९ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. १६,
पश्चिमेस : प्लॉट नं. १४,
दक्षिणेस : ४ मीटर रस्ता , उत्तरेस : प्लॉट नं. ९.

श्री गौराजी पांडुरंग कसेवाड यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधीतास सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार अनिता सुनिल वरपडे, रा. छत्रपती चौक, नांदेड ता. जि. नांदेड यांनी ग्रा.पं. विष्णुपूरी, ता. जि. हद्दीतील मौजे विष्णुपूरी येथील ग्रामपंचायत कार्यालय नमुना नं. 8 चा उतारा नुसार मालमत्ता क्रं. 1258, ज्याचे एकुण क्षेत्रफळ 1575 चौ.फुट म्हणजे 146.37 चौ.मी. आहे. ज्यावर आर.सी.सी. चे घर बांधलेले आहे. ज्याचे एकुण बांधकाम क्षेत्र 1200 चौ.फुट (G + 3 मजली) म्हणजे 111.52 चौ.मी. आहे. ज्याची चतु:सिमा पुर्वेस: रस्ता, पश्चिमेस: प्लॉट नं. 178, दक्षिणेस: रस्ता, उत्तरेस: प्लॉट नं. 167 आहे. वरील चतु:सिमेच्या आतील घराचे मालक व कब्जेदार अमित पुष्पराज शेवडकर, रा. रंगार गल्ली, भावसार विठ्ठल मंदिर जवळ, नांदेड यांनी वरील घर विक्री करण्याबाबत, माझे पक्षकाराच्या हक्कात सौदाचिठ्ठी करुन दिलेली आहे. सदर करारापोटी माझ्या पक्षकाराने अमित पुष्पराज शेवडकर यांना बयाना म्हणून काही रक्कम दिलेली आहे व माझे पक्षकार लवकरच खरेदीखत करून घेणार आहेत.

तरी सर्व जनतेस व संबंधितास सुचित करण्यात येते की, वरील मालमत्ता व व्यवहारा बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा उजर/ आक्षेप असेल किंवा वरील मालमत्ते बाबत कोणा बरोबरही कोणताही करार/ विक्री/ गहाण, हस्तांतरण, बक्षीस, दान, भाडेपट्टा, भाडेकरार इत्यादी अंतर्गत बोज्याखाली असेल किंवा वरील मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे मालकी हक्क, वारसा अधिकार, अतिक्रमण वाद असेल, किंवा वरील मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचे शासकीय, खाजगी, सोसायटीचे कर्ज बोजाबाकी असेल तर हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाचे आत आपला उजर/ आक्षेप कागदोपत्री पुराव्यासह निम्नस्वाक्षरीताकडे लेखी नोंदवावा. मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास माझे पक्षकार खरेदीखत करून घेतील. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा कोणताही विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत
**अॅड. गुलाब एकनाथराव मोरे,**
शॉप नं.04, विश्वतेज रेसीडेन्सी, तिरूमला हॉस्पीटलजवळ, छत्रपती चौक, नांदेड.

नोटीस देणार
**अनिता सुनिल वरपडे**
रा. छत्रपती चौक, नांदेड.

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
### जाहिरात प्रगटन
### (नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, आकाश सिताराम खांडरे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५००), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०५) मालमत्ता नं. (एफ-०२) नवीन वार्ड क्र. (...) नवीन मालमत्ता नं. (२७५६) साईज पूर्व-पश्चिम १२.३४ मीटर, दक्षिण-उत्तर ९.१४ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : गट क्र. ४९५,
पश्चिमेस : ६.१० मीटर रस्ता,
दक्षिणेस : प्लॉट नं. ४, उत्तरेस : प्लॉट नं. ६.

श्री ............ यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
### जाहिरात प्रगटन
### (नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, ओंकार पेंटाजी यडलवाड यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (....), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (४५) मालमत्ता नं. (३०९९) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (३२८८) साईज पूर्व-पश्चिम ९.०० मीटर, दक्षिण-उत्तर १३.०० मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : ९ मीटरचा रस्ता,
पश्चिमेस : प्लॉट नं. ६४,
दक्षिणेस : प्लॉट नं. ४६, उत्तरेस : प्लॉट नं. ४४.

श्री विठ्ठल अनिलराव धोंडगे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
### जाहिरात प्रगटन
### (नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, लक्ष्मीबाई गोविंद कदम यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (२२), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (८०) मालमत्ता नं. (२२६७/२) नवीन वार्ड क्र. (०३) नवीन मालमत्ता नं. (४२६) साईज पूर्व-पश्चिम ८.५९ मीटर, दक्षिण-उत्तर १५.२५ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : पाणंद रस्ता,
पश्चिमेस : प्लॉट नं. १८० ,
दक्षिणेस : प्लॉट नं. १८५, उत्तरेस : रस्ता.

श्री नागनाथ रामन्न कोंडलवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

# नगर पंचायत कार्यालय, अर्धापूर जि. नांदेड

**ई-निविदा सूचना क्र. १५३४/२०२५-२६ दि. ०१/०८/२०२६**

नगर पंचायत अर्धापूर मार्फत नगर पंचायत स्वनिधी अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या पुतळ्यासाठी चबुतऱ्याचे बांधकामसाठी योग्य कंत्राटदाराकडून ई निविदा कार्यप्रणालीद्वारे दि. ०१/०८/२०२६ वेळ दुपारी १२:०० पासून निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा सर्व तपशील, अटी व शर्ती आणि शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ http//mahatenders.gov.in वर पहावयास व डाउनलोड करता येईल.

स्वा/-
अध्यक्षा
नगर पंचायत, अर्धापूर

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत, अर्धापुर

# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

# मोबाइल इंटरनेटच्या नियमांत मोठ्या बदलाची तयारी

## Google Pay मध्ये आता Gemini AI

### Ask Google Pay फीचरने खर्च, बचत अन् बजेटचे व्यवस्थापन होणार अधिक सोपे




**Google ने भारतातील Google Pay ॲपमध्ये Gemini AI वर आधारित Ask Google Pay हे नवीन AI फीचर टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे. या सुविधेमुळे वापरकर्त्यांना मजकूर (Text) किंवा आवाजाच्या (Voice) माध्यमातून खर्चाचे विश्लेषण, बचतीसाठी सल्ले, योग्य क्रेडिट कार्ड ऑफर्स, SIP, CIBIL स्कोअर यांसारखी आर्थिक माहिती सहज मिळणार आहे. हे फीचर डिफॉल्टने सुरू (On) नसणार असून, वापरकर्त्यांना ते स्वतः सक्रिय (Enable) करावे लागेल. याशिवाय, Google ने भारतात RuPay नेटवर्कवर आधारित Google Pay Flex SBI कार्ड देखील सादर केले आहे.**

### Ask Google Pay म्हणजे काय?

Ask Google Pay हे Google Pay मधील Gemini AI वर आधारित स्मार्ट सहाय्यक (AI Assistant) आहे. हे फीचर वापरकर्त्यांच्या खर्चाच्या पद्धतीचे विश्लेषण करून आर्थिक नियोजन अधिक सोपे बनवते.

### या सुविधेद्वारे वापरकर्ते...

आपल्या खर्चाचे विश्लेषण करू शकतात. बचत वाढवण्यासाठी वैयक्तिक सल्ले मिळवू शकतात. स्वतःसाठी योग्य क्रेडिट कार्ड ऑफर्स शोधू शकतात. SIP आणि CIBIL स्कोअरची माहिती मिळवू शकतात. आर्थिक बाबी सोप्या भाषेत समजून घेऊ शकतात. Google च्या मते, UPI मुळे डिजिटल पेमेंट सोपे झाले असले तरी अनेकांच्या मनात 'मागील महिन्यात नेमका खर्च कुठे झाला?', 'माझ्यासाठी योग्य क्रेडिट कार्ड कोणते?' अशा अनेक आर्थिक शंका असतात. 'Ask Google Pay' याच प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी तयार करण्यात आले आहे.

### मजकूर आणि आवाजाद्वारे विचारता येतील प्रश्न

- हे फीचर Text आणि Voice या दोन्ही माध्यमांत उपलब्ध असेल. सुरुवातीला यात १० भारतीय भाषांना समर्थन देण्यात आले आहे.
- वापरकर्ते AI ला पुढीलप्रमाणे प्रश्न विचारू शकतात...
- गेल्या आठवड्यातील माझ्या खर्चाचे विश्लेषण करा.
- माझ्यासाठी सर्वोत्तम क्रेडिट कार्ड कोणते?
- मी अधिक बचत कशी करू शकतो?
- माझ्या खर्चानुसार योग्य आर्थिक नियोजन काय असू शकते?
- सध्या हे फीचर भारतातील निवडक Google Pay वापरकर्त्यांसाठी टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येत आहे.

### मिळणार अनेक स्मार्ट सुविधा

Personalisation within Google Pay सेटिंग सुरू केल्यानंतर AI अधिक अचूक आणि वैयक्तिक माहिती देण्यासाठी Google Pay व्यवहारांचा इतिहास, सेव्ह केलेल्या पेमेंट पद्धती, Google खात्यातील संबंधित माहिती, CIBIL रिपोर्टमधील माहिती या माहितीचा वापर करू शकतो. याशिवाय, Ask Google Pay सोबत झालेला चॅट इतिहास ४२ दिवसांपर्यंत पाहता येईल. वापरकर्त्यांना हवे असल्यास Personalisation कधीही बंद करण्याचाही पर्याय उपलब्ध असेल.

### Ask Google Pay फीचर कसे सुरू कराल?

Google Pay ॲप उघडा. Settings मध्ये जा. Privacy & Security पर्याय निवडा. त्यानंतर Data & Personalisation विभागात जा. Personalisation within Google Pay हा पर्याय सुरू (Enable) करा. आता होम स्क्रीनवरील Money टॅब उघडा. Ask about your finances किंवा AI Assistant विभागात जाऊन Ask a Question वर टॅप करा. त्यानंतर तुम्ही मजकूर किंवा आवाजाद्वारे तुमच्या आर्थिक व्यवहारांबाबत प्रश्न विचारू शकता. Ask Google Pay हे फीचर वापरणे पूर्णपणे ऐच्छिक (Optional) आहे. Google हे फीचर आपोआप सुरू करत नाही. त्यामुळे ज्यांना AI च्या मदतीने खर्च, बचत आणि आर्थिक नियोजन अधिक स्मार्ट पद्धतीने करायचे आहे, तेच वापरकर्ते हे फीचर सक्रिय करून त्याचा लाभ घेऊ शकतात.



## Jio, Airtel, Vi कडून विविध सेवांसाठी स्वतंत्र शुल्क आकारण्याची शक्यता!



**भारतातील इंटरनेट वापराच्या नियमांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकार अनेक वर्षांपासून लागू असलेल्या 'नेट न्यूट्रॅलिटी' (Net Neutrality) नियमांचा फेरआढावा घेण्याच्या तयारीत आहे. हे बदल लागू झाल्यास Jio, Airtel आणि Vi यांसारख्या दूरसंचार कंपन्यांना इंटरनेट सेवा, गती आणि वापराच्या प्रकारानुसार ग्राहकांकडून वेगवेगळे शुल्क आकारण्याची मुभा मिळू शकते. एका अहवालानुसार, सरकार विद्यमान नेट न्यूट्रॅलिटी नियमांमध्ये बदल करण्याचा विचार करत आहे. त्यानुसार गेमिंग, व्हिडिओ स्ट्रीमिंग, हेल्थकेअर, स्वयंचलित वाहने (Autonomous Vehicles), स्मार्ट फॅक्टरी आणि इतर विशेष सेवांसाठी स्वतंत्र शुल्क आकारण्याची परवानगी दूरसंचार कंपन्यांना दिली जाऊ शकते.**

### विशेष सेवांसाठी स्वतंत्र शुल्क आकारण्याची शक्यता

सरकार नेट न्यूट्रॅलिटीच्या नियमांचे पुनरावलोकन करत असून, त्याअंतर्गत दूरसंचार कंपन्यांना विविध प्रकारच्या इंटरनेट कनेक्टिव्हिटी, वेग आणि विशेष सेवांसाठी वेगवेगळे दर आकारण्याची मुभा मिळू शकते. यामध्ये सामान्य मोबाईल ग्राहकांसह उद्योग आणि व्यावसायिक कंपन्यांचाही समावेश असेल. सध्याच्या नियमांनुसार दूरसंचार कंपन्यांना अशा प्रकारची भेदभावपूर्ण सेवा देण्यास मनाई आहे. मात्र, 5G नेटवर्क स्लायसिंग (5G Network Slicing) सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आगमनानंतर विद्यमान नियम कालबाह्य आणि अतिशय कठोर वाटू लागल्याने सरकार त्यांचा फेरविचार करत आहे.

### नेट न्यूट्रॅलिटी म्हणजे काय?

नेट न्यूट्रॅलिटी म्हणजे इंटरनेटवरील सर्व वेबसाइट्स, ॲप्स आणि ऑनलाइन सेवांना कोणताही भेदभाव न करता समान वागणूक देण्याचा नियम. या तत्त्वानुसार इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या कंपन्या Jio, Airtel, Vi यांना कोणत्याही विशिष्ट ॲप किंवा वेबसाइटचा वेग कमी-जास्त करता येत नाही. तसेच कोणतीही सेवा मुद्दाम बंद करणे, एखाद्या कंपनीकडून पैसे घेऊन तिच्या सेवेला अधिक वेग (Fast Lane) देणे किंवा इतर सेवांना कमी प्राधान्य देणेही शक्य नसते. म्हणजेच इंटरनेटवरील प्रत्येक वापरकर्ता आणि प्रत्येक सेवा समान नियमांखाली येते.

### सरकार फेरविचार का करत आहे?

भारतात 2022 पासून 5G सेवा सुरू झाल्यानंतर विशेषतः 5G नेटवर्क स्लायसिंग संदर्भात विद्यमान नियमांची अंमलबजावणी कशी करावी, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे सरकार या विषयावर पुन्हा विचार करत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सरकारने TRAI (Telecom Regulatory Authority of India) ला विद्यमान नेट न्यूट्रॅलिटी नियमांचा अभ्यास करून आवश्यक बदल सुचविण्याचे निर्देश दिले आहेत. हा विषय अद्याप विचाराधीन असल्याने अधिकृत माहिती सार्वजनिक करण्यात आलेली नाही.

### Jio आणि Airtel आधीच वापरत आहेत 5G नेटवर्क स्लायसिंग

भारती एअरटेलने आपल्या पोस्टपेड ग्राहकांसाठी अधिक वेगवान इंटरनेट आणि कमी विलंब (Low Latency) देण्यासाठी 5G नेटवर्क स्लायसिंगवर आधारित सेवा सुरू केली आहे. या सेवेची सध्या दूरसंचार विभाग (DoT) आणि नियामकांकडून तपासणी सुरू आहे. दुसरीकडे, रिलायन्स जिओनेही दाट लोकवस्तीच्या शहरी भागांमध्ये नेटवर्कची क्षमता आणि कव्हरेज सुधारण्यासाठी 5G नेटवर्क स्लायसिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्याची योजना जाहीर केली आहे. अमेरिका, ब्रिटन, सिंगापूर, मलेशिया आणि चीन यांसारख्या अनेक देशांमध्ये विशिष्ट ग्राहक आणि उद्योगांसाठी अशा प्रकारच्या 5G नेटवर्क स्लायसिंगचा वापर आधीपासूनच केला जात आहे.



## 2, 4 की 8 अँटेना? तुमच्यासाठी कोणता Wi-Fi राऊटर सर्वोत्तम?

**घर किंवा कार्यालयासाठी नवीन Wi-Fi राऊटर खरेदी करताना अनेकांचा असा समज असतो की राऊटरवर जितके अधिक अँटेना, तितका इंटरनेटचा वेग जास्त. मात्र, हे पूर्णपणे खरे नाही. अधिक अँटेना असलेला राऊटर सिग्नल अधिक स्थिर ठेवण्यास आणि विस्तृत क्षेत्र व्यापण्यास मदत करतो, पण तुमच्यासाठी योग्य राऊटर कोणता ठरेल हे केवळ अँटेनांच्या संख्येवर अवलंबून नसते. राऊटर निवडताना तुमच्या इंटरनेट प्लॅनचा वेग (Bandwidth), घर किंवा कार्यालयाचा आकार, एकाच वेळी जोडल्या जाणाऱ्या उपकरणांची संख्या आणि इंटरनेटचा वापर कशासाठी होतो, या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. चला, २, ४ आणि ८ अँटेना असलेल्या राऊटरमधील फरक समजून घेऊया...**



### 2 अँटेना असलेला राऊटर कोणासाठी योग्य?

जर तुमचे घर १ BHK किंवा जास्तीत जास्त दोन खोल्यांचे असेल, तर २ अँटेना असलेला राऊटर पुरेसा ठरतो. योग्य ठिकाणी बसवल्यास संपूर्ण घरात चांगले नेटवर्क मिळू शकते. ३ ते ५ उपकरणे (स्मार्टफोन, लॅपटॉप, टीव्ही इ.) जोडण्यासाठी योग्य. १०० Mbps पर्यंतच्या इंटरनेट प्लॅनसाठी उत्तम पर्याय. वेब ब्राउझिंग, WhatsApp, सोशल मीडिया, ऑनलाइन शिक्षण तसेच SD किंवा HD दर्जातील व्हिडिओ पाहण्यासाठी पुरेसा. अशा राऊटरची किंमत साधारण ८०० ते १,५०० रुपयांदरम्यान असते.

### 4 अँटेना असलेला राऊटर कोणासाठी?

२ अँटेना राऊटरच्या तुलनेत ४ अँटेना राऊटर हा मोठा अपग्रेड मानला जातो. बहुतांश ४ अँटेना राऊटरमध्ये ड्युअल-बँड (२.४ GHz आणि ५ GHz) सुविधा उपलब्ध असते, त्यामुळे अधिक वेग आणि स्थिर कनेक्शन मिळते. २ किंवा ३ BHK घर, मध्यम आकाराचे कार्यालय किंवा अनेक खोल्यांसाठी योग्य. एकाच वेळी ८ ते १५ उपकरणे सहज जोडता येतात. स्मार्टफोन, लॅपटॉप, स्मार्ट टीव्ही, स्मार्ट स्पीकर आणि इतर स्मार्ट होम उपकरणांसाठी आदर्श. १०० Mbps ते ३०० Mbps इंटरनेट प्लॅनसाठी सर्वोत्तम. ४K व्हिडिओ स्ट्रीमिंग, वर्क फ्रॉम होम, ऑनलाइन गेमिंग आणि स्मार्ट होम सेटअपसाठी उत्कृष्ट. किंमत साधारण १,५०० ते ३,५०० रुपयांपर्यंत असू शकते.

### 8 अँटेना असलेला राऊटर कोणासाठी?

मोठे घर, डुप्लेक्स, व्हिला, कॉर्पोरेट कार्यालय, कॅफे किंवा प्रो-गेमिंग सेटअपसाठी ८ अँटेना असलेला राऊटर अधिक योग्य ठरतो. ४ BHK किंवा त्यापेक्षा मोठ्या घरांसाठी आदर्श. २५ ते ५० उपकरणे एकाच वेळी सहज जोडता येतात. ५०० Mbps ते १ Gbps किंवा त्याहून अधिक वेगाच्या इंटरनेट प्लॅनसाठी योग्य. ४K आणि ८K स्ट्रीमिंग, ई-स्पोर्ट्स गेमिंग, मोठ्या फाइल्सचे ट्रान्सफर आणि व्यावसायिक वापरासाठी उत्कृष्ट. अशा राऊटरची किंमत साधारण १५,००० रुपये ते ३५,००० रुपये किंवा त्याहून अधिक असते.

## पासवर्ड विसरलात?

### आता सेल्फी दाखवून उघडा Gmail खाते; Selfie Unlock फीचर कसे सुरू कराल?

**तुमच्याही बाबतीत असे अनेकदा घडते का की, गरज पडल्यावर Gmail खात्याचा पासवर्डच आठवत नाही? अशा वेळी फक्त स्वतःचा चेहरा दाखवून Gmail मध्ये लॉग-इन करता आले तर? हे आता शक्य झाले आहे. Google ने Selfie Video Sign-in हे नवे फीचर उपलब्ध करून दिले असून, पासवर्ड विसरल्यास चेहरा ओळखून खाते उघडण्याची सुविधा यात मिळते. मात्र, हे फीचर वापरण्यापूर्वी काही आवश्यक सेटिंग्ज कराव्या लागतात. त्या कशा करायच्या आणि हे फीचर कसे सुरू करायचे, ते जाणून घेऊया...**



### Gmail मध्ये सेल्फीद्वारे साइन-इन कसे कराल?

Google ने हे फीचर अशा वापरकर्त्यांसाठी आणले आहे, ज्यांना वारंवार Gmail चा पासवर्ड विसरण्याची समस्या येते. एकदा सेल्फी व्हिडिओ नोंदवल्यानंतर पासवर्ड आठवत नसला तरी चेहरा ओळखून खाते उघडता येते. यासाठी Google App किंवा Gmail App मधील काही सेटिंग्ज बदलणे आवश्यक आहे.

### Selfie Video to Unlock फीचर

सर्वप्रथम Google App किंवा Gmail App उघडा आणि ते अद्ययावत (Latest Version) असल्याची खात्री करा. वर उजव्या बाजूला असलेल्या Profile Picture वर टॅप करा. Manage your Google Account या पर्यायावर क्लिक करा. त्यानंतर Security & Sign-in विभागात जा. खाली स्क्रोल करून Add more sign-in options अंतर्गत Selfie Video पर्याय निवडा. ॲपला Camera Permission द्या आणि अटी-शर्ती स्वीकारा. स्क्रीनवर दिलेल्या सूचनांनुसार चेहरा वेगवेगळ्या दिशांना फिरवा, जेणेकरून चेहऱ्याची पडताळणी पूर्ण होईल. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तुमचा सेल्फी व्हिडिओ साइन-इनसाठी जतन केला जाईल.

### सेल्फी व्हिडिओ बदलायचा असल्यास...

जर आधी नोंदवलेला सेल्फी व्हिडिओ बदलायचा किंवा हटवायचा असेल, तर पुढील पद्धत वापरा. Google App किंवा Gmail App उघडा. Profile Picture वर क्लिक करा. Manage your Google Account निवडा. Security & Sign-in विभागात जा. Selfie Video पर्यायावर टॅप करा. येथे Remove (हटवा) किंवा Change/Replace (बदला) यापैकी आवश्यक पर्याय निवडा. नवीन सेल्फी व्हिडिओ नोंदवण्यासाठी पुन्हा Camera Permission द्या. स्क्रीनवरील सूचनांनुसार चेहरा फिरवून नवीन व्हिडिओ रेकॉर्ड करा. या सुविधेमुळे अनेक फायदे मिळू शकतात. वारंवार पासवर्ड टाइप करण्याची किंवा लक्षात ठेवण्याची गरज राहत नाही.

# पोर्टलवरील कर्जमाफीची रक्कमच अंतिम; शेतकऱ्यांनी संभ्रम बाळगू नये -जिल्हाधिकारी कर्डिले

## आधार प्रमाणीकरण व ग्रीस्टॅक नोंदणी तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**–राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६ अंतर्गत गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या याद्यांमधील थकबाकीची रक्कम आणि योजनेच्या पोर्टलवरील रक्कम यात तफावत आढळल्यास शेतकऱ्यांनी कोणताही संभ्रम न बाळगता पोर्टलवर दर्शविलेली रक्कमच अंतिम व ग्राह्य मानावी, असे स्पष्ट आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण (श–घधउ) आणि ग्रीस्टॅक नोंदणी प्राधान्याने पूर्ण करावी, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे व विविध माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुरू केलेल्या या योजनेत कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना (जढड) आणि प्रोत्साहनपर लाभ या तीन घटकांचा समावेश आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख २४ हजार कर्जखाती पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून ९९ हजार पात्र खाती प्राप्त झाली आहेत. त्यापैकी ३२ हजार खात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण वेगाने सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

व्यापारी बँकांमधील एनपीए खातेदार शेतकऱ्यांच्या गावपातळीवरील याद्यांतील थकबाकी आणि पोर्टलवरील रक्कम यामध्ये फरक असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले की, पोर्टलवरील थकबाकी ही ३१ मार्च २०२६ पर्यंतची असून तीच ग्राह्य आहे. शासनाने १ जुलै २०२६ रोजी सर्व बँकांना १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज आकारू नये असे निर्देश दिले असून सर्व बँकांनी त्यास लेखी संमती दिली आहे.

शेतकऱ्यांनी पोर्टलवरील रक्कम मान्य असल्यास त्वरित आधार प्रमाणीकरण करावे. प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर मिळणाऱ्या पावतीमध्ये मंजूर कर्जमुक्तीची रक्कम नमूद असेल. त्यानंतर संबंधित लाभाची रक्कम डीबीटीद्वारे थेट कर्ज खात्यात जमा करण्यात येईल. कर्जमुक्ती पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना कर्ज बेबाकी प्रमाणपत्र देण्यात येईल तसेच लाभार्थ्यांच्या याद्या संबंधित बँक शाखा आणि विविध कार्यकारी सेवा संस्थांमध्ये प्रसिद्ध केल्या जातील.

पोर्टलवरील रक्कम किंवा कर्जाच्या तपशीलाबाबत आक्षेप असल्यास शेतकऱ्यांनी योजनेच्या पोर्टलवर 'ग्रिव्हन्स' (ञीळशींरपलश) नोंदवावी. या तक्रारींचे निराकरण जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत करण्यात येणार आहे. यासाठी आपले सरकार सेवा केंद्रेही सक्रिय करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

# माऊली हॉस्पीटल येथे उद्या गुरूदेव पुण्यतिथी

**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी सद्‌गुरू पार्वती माऊलींची पुण्यतिथी दि. २ ऑगस्ट रोजी साजरी होणार आहे. वारकरी संप्रदायिक पद्धतीने सर्व कार्यक्रम होणार आहेत. सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत हभप अच्युत महाराज दस्तापूरकर यांचे कीर्तन होईल व नंतर महाप्रसाद होणार आहे.

या कार्यक्रमात जिल्ह्यातील अनेक कीर्तनकार व गायक आपली सेवा समर्पित करणार आहेत. यात हभप मधुसूदन महाराज कापसीकर, माधव महाराज बोरगडीकर, चंद्रकांत महाराज लाठकर, बालाजी महाराज मुडेवार, दत्ता महाराज वळसंगवाडीकर, माधव महाराज येलूरकर, भास्कर महाराज कामारीकर आणि अन्य हरिभक्तांचा सहभाग राहणार आहे.

या कार्यक्रमानंतर परभणी येथे आयोजित राष्ट्रसंत मोरारी बापू यांच्या रामकथेबद्दल बैठक होणार आहे. वै. पूज्य मारोती महाराजांच्या शतकी जयंती सोहळ्याला उपस्थित राहून विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शिवाजी शिंदे आणि माऊली परिवारातर्फे करण्यात आले आहे.

# मराठवाड्याच्या रेल्वे प्रश्नांसाठी खा. अशोकराव चव्हाण यांनी घेतली रेल्वेमंत्र्यांची भेट

## हडपसर एक्स्प्रेससह नांदेडच्या कोचिंग डेपोकडे वेधले लक्ष



**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी शुक्रवारी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची संसदेतील त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन नांदेड–हडपसर एक्स्प्रेससह मराठवाड्यातील रेल्वेच्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधले.

या भेटीदरम्यान खा. चव्हाण यांनी रेल्वेमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात नांदेड– हडपसर एक्स्प्रेसच्या मुद्द्यावर विशेष भर होता. ही गाडी हडपसरला पहाटे पोहोचत असल्याने प्रवाशांना होणारा मनस्ताप आणि आर्थिक भुर्दंड टाळण्यासाठी, ती पुन्हा पुणे मुख्य रेल्वे स्थानकापर्यंत चालवण्याची मागणी त्यांनी केली. पुणे रेल्वे स्थानकावर गाडी उभी करण्यासाठी जागा नसल्यास ती पनवेल–चिपळूण किंवा मिरज, सांगली, कोल्हापूरपर्यंत वाढवण्यात यावी, असा पर्यायही त्यांनी सुचवला. तसेच वेळेअभावी डब्यांची योग्य देखभाल होत नसल्याने या गाडीची हरंगुळ–हडपसर गाडीसोबत असलेली 'रेक शेअरिंग' बंद करून दोन्ही गाड्यांना स्वतंत्र रेक उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी याप्रसंगी केली. पुणे रेल्वे स्थानकावर सध्या दुरुस्ती व प्लॅटफॉर्म्सची कामे सुरु असून, त्यानंतर या मागणीबाबत विचार करणे शक्य असल्याचे रेल्वे मंत्र्यांनी याबाबत उत्तर देताना सांगितले.

यासोबतच आगामी मुंबई–हैदराबाद वंदे भारत स्लीपर ट्रेन मनमाड–छत्रपती संभाजीनगर–नांदेड मार्गे चालवावी, जेणेकरून मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील मोठ्या भागाला या प्रीमियम व आधुनिक रेल्वे सेवेचा लाभ मिळेल, असेही खा. अशोकराव चव्हाण यांनी सुचवले. नांदेड रेल्वे स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी मालटेकडी यार्डात सुमारे ४८८.१० कोटी रुपयांचा अंदाजित खर्च असलेल्या कोचिंग डेपोची उभारणी करण्याचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे सादर झालेला आहे. या प्रस्तावाला त्वरित मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी पायाभूत सुविधांच्या विकासाबाबत बोलताना केली. ऑगस्ट २०२५ मध्ये मंजूर झालेल्या १७७.२९ किमी लांबीच्या व सुमारे २ हजार कोटी रुपये अंदाजित खर्च असलेल्या छत्रपती संभाजीनगर – परभणी रेल्वे मार्ग दुहेरीकरणाचे भूसंपादन लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता देखील त्यांनी विशद केली.

**पान १ वरून...**

**सायबर फसवणुकीसाठी बँक...**

खात्याचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. या खात्यातून ८४ लाख ६६ हजार ६६४ रुपये विविध बँक खात्यांमध्ये वळविण्यात आले. तसेच टी–शर्ट व्यवसाय वाढवून देण्याचे खोटे आमिष दाखवून मोहित खियानी यांची फसवणूक करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सुरू आहे. या तिन्ही प्रकरणांमुळे सायबर फसवणुकीसाठी बँक खात्यांचा वापर करणाऱ्या रॅकेटविरोधात पोलीस प्रशासनाने कारवाई तीव्र केली आहे.

पारंपरिक चोरी, दरोडा न टाकता सायबर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ऑनलाईन दरोडा टाकण्याचे प्रकार वाढत आहेत. केवळ काही पैशांच्या मोबदल्यात आपले बँक खाते व एटीएम सायबर रॅकेटकडे सोपविण्यात येते. त्या खात्यांच्या माध्यमातून आर्थिक गैरव्यवहार मोठ्या प्रमाणात करण्यात येतात.

या गंभीर प्रकारावर अंकुश बसविण्यासाठी महाराष्ट्र सायबर विभाग कार्यरत आहे. या विभागाद्वारे राज्यभरातील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील सायबर सेल कार्यरत असतो. दिवसेंदिवस सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

या घटनांची उकल व आळा घालण्यासाठी प्रत्येक शुक्रवारी राज्यभरात केंद्र व राज्य शासनाच्या वतीने कार्यरत असलेल्या सायबर विभागाची व्हीडीओ कॉन्फरन्सिंग होते. जिल्ह्यात यापूर्वी म्युल अकाउंटची घटना सायबर शाखेने उघडकीस आणली होती.

# लोह्यात जगत्‌ज्योती महात्मा बसवेश्वर पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी एक कोटी रुपये खर्च करणार -आ. चिखलीकर

**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा नगर परिषदेच्या प्रांगणात जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचा भव्य अश्वारूढ पुतळा मागील सत्ता काळात उभारण्यात आला आहे. त्या पुतळ्याचे सुशोभिकरण करण्याचे आश्वासन शहरवासीयांना व समाजबांधवांना दिले होते, त्याची पूर्तता करण्यात येणार आहे. जवळपास एक कोटी रूपये खर्चून सुशोभीकरण करण्यात येणार असून, येत्या २ ऑगष्ट रोजी कामाचा शुभारंभ होईल, असे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी जाहीर केले.



लोहा नगर परिषद सभागृहात गुरुवार, दि. ३० जुलै रोजी सायंकाळी वीरशैव–समाजाची महत्त्वपूर्व सुसंवाद बैठक नगराध्यक्ष शरद पवार व त्यांच्या सर्व सहकार्यांनी आयोजित केली होती. या बैठकीला आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, तहसीलदार विठ्ठल परळीकर, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करिम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, मुख्याधिकारी संदीप भोळे, सचिन पाटील चिखलीकर, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, तालुकाध्यक्ष छत्रपती स्वामी, गटनेता भास्कर पवार, हरिभाऊ चव्हाण यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

जगत्‌ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळा शुशोभीकरणासाठी निवडणूक काळात समाज बांधव व शहरवासीयांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. दोन्ही तालुक्यात महामानवांचे पुतळे उभारणे, त्यांचे सुशोभीकरण करणे हे या भागाचा आमदार म्हणून माझे कर्तव्य आहे, असे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सुसंवाद बैठकीत जाहीर केले.

यावेळी नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करिम शेख व सर्व नगरसेवकांनी आयोजित केलेल्या बैठकीला मलकार्जुन शेटे, दत्ता शेटे, प्रभाकर टाले, माजी नगरसेक बाबुराव डोम, नगरसेवक विलास कहाळेकर, मलकार्जुन कहाळेकर, माधव कतुरे, वाडेवाले टेलर, शिवा शेटे, राजु शेटे, ईश्वर सोनवळे, यांच्यासह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.



# अवैध वाळू उपसा करणारी ३.६४ कोटींची यंत्रसामुग्री जप्त; बारा जणांवर गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत नांदेड ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. असर्जन ते मार्कंड शिवारातील गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खननाविरोधात धडक कारवाई करत तब्बल ३ कोटी ६४ लाख ४५ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी १२ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवार, दि. ३० जुलै रोजी नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, असर्जन ते मार्कंड शिवारातील गोदावरी नदीपात्रात काही व्यक्ती बोटी, तराफे व इंजिनांच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळूचे उत्खनन करत आहेत. या माहितीच्या आधारे पंचांसमक्ष घटनास्थळी छापा टाकण्यात आला. पोलिसांची चाहूल लागताच काहीजण नदीपात्रातून पसार झाले. मात्र घटनास्थळी मोठ्या प्रमाणात वाळू उत्खनासाठी वापरण्यात येणारे साहित्य व यंत्रसामग्री आढळून आली.

२११ तराफे अंदाजे १ कोटी ५ लाख ५० हजार रुपये (जागेवर नष्ट), १५ इंजिने अंदाजे ४५ लाख (जागेवर नष्ट), १० मोठ्या लोखंडी बोटी अंदाजे १ कोटी ५० लाख (जागेवर नष्ट), ५ लहान लोखंडी बोटी अंदाजे ५० लाख (जागेवर नष्ट), १६० ब्रास वाळू (८० तराफ्यांवरील) अंदाजे ८ लाख रुपये, १०० ब्रास वाळू (नदीकाठावरील) अंदाजे ५ लाख रुपये, २५ मोठे टोपले, २० खोरे, २० लोखंडी ड्रम, ८ प्लास्टिक ड्रम, २० लोखंडी पाईप असा एकूण ९५ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



महाराष्ट्र ग्रामीण बँक

ग्रामीण समृद्धीची विश्वासार्ह बँक

जागा पाहिजे

महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेसाठी पावडेवाडी नाका नांदेड शहरातील प्रमुख परिसरामध्ये (पावडेवाडी नाका यशवंत नगर) रस्त्यालगत आरसीसी बांधकाम असलेली, सर्व सोयींनी युक्त, अंदाजे १200 ते १५00 चौ. फूट क्षेत्रफळाची जागा भाडेतत्वावर किमान १५ वर्षाच्या करारावर पाहिजे आहे.

आवश्यक अटी :

- किमान १५ वर्षांच्या करारावर जागा उपलब्ध असावी.
- जागेवर पार्किंग व्यवस्था असणे आवश्यक आहे.
- रस्त्यालगत (मुख्य रस्त्यावर/प्रमुख परिसरात) असावी.
- सर्व सोयींनी युक्त आणि आरसीसी बांधकाम असलेली जागा हवी.




इच्छुक जागा मालकांनी आवश्यक कागदपत्रांसह भाडे प्रस्ताव दिनांक 8 ऑगस्ट 2026 पर्यत खालील पत्यावर सादर करावा.

पत्ता :

महाराष्ट्र ग्रामीण बँक
शाखा : पावडेवाडी नाका नांदेड

संपर्क : 7588938706

शाखा व्यवस्थापक
पावडेवाडी नाका नांदेड











**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com